**MHOS100005882018**

नियमित दिवाणी दावा क्र. २६३/२०१८
(CNR No.**MHOS100005882018**)

निशाणी क्र. ३४ खाली आदेश

०१. वादी क्र. १ व २ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे, दाव्यात दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादीच्या कथनानुसार, प्रस्तुतचा दावा हा वादी क्र. १ व २ हे अज्ञान असल्याने वादी क्र. ३ यांनी त्यांच्या वतीने अज्ञान पालनकर्ती म्हणुन दाखल केला आहे. वादी क्र. १- विजयश्री सोपान शेळके व वादी क्र. २- अभिषेक सोपान शेळके हे सज्ञान असुन वादी क्र. १ चे आज रोजी वय २१ वर्षे आहे तसेच वादी क्र. २- चे आज रोजी वय १९ वर्षे आहे. त्यामुळे वादी क्र. १ व २ हे सदरचा दावा यापुढे स्वतःच्या क्षमतेने चालविण्यास सक्षम व तयार आहेत. त्यामुळे वादी क्र. १ व २ यांचे तर्फे अ.पा.क. म्हणुन वादी. क्र. ३- सविता सोपान शेळके यांच्या नावाची असलेली नोंद कमी करण्यात यावी व सध्याचे वय नमुद करण्याची परवानगी मिळावी व तशी दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी, अशी विनंती केली.

०३. प्रतिवादी तर्फे सदर अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारली. त्यांच्या म्हणण्यानुसार, सदर प्रकरणातील वादी क्र. १ व २ हे सज्ञान झालेले आहेत त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली.

०४. वादी व प्रतिवादींच्या कथनांचा एकत्रित विचार करता, माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात, त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | सुचवलेली दावा दुरुस्ती पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णित करण्यासाठी आवश्यक आहे काय ? | होकारार्थी |
| २) | सुचवलेल्या दावा दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होईल काय ? | नकारार्थी |
| ३) | आदेश काय ? | अर्ज खर्चासह मंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

मुद्दा क्र.१ ते ३ करीता -

०५. मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्याच्या कारणांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते सर्व चर्चेकरीता एकत्रित विचारात घेण्यात येत आहेत.

०६. पुढील विवेचन करण्यापुर्वी या ठिकाणी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६ नियम १७ मधील खाली नमुद कायदेशिर तरतुद पाहणे उचित ठरेल.

**१७. वादकथनातील सुधारणा -**

न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोपैकी कोणत्याही पक्षकारांस, त्याच्या वादकथनास, न्याय्य असेल अशा रीतीने व अशा अटींवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देण्यात येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारण केल्या पाहिजेत.

परंतू न्यायचौकशी सुरु झाल्यानंतर, पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेवुनसुध्दा न्यायचौकशी सुरु होण्यापुर्वी ती बाब पुढे आणता

आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झालेले असल्याखेरीज सुधारणेसाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही.

०७. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंच्या वकीलांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुतचा दावा दावामिळकतीसंदर्भाने वाटणी होवुन मिळण्याकरीता तसेच खरेदीखत क्र. १०२६/२०१८ हे वादीवर बंधनकारक नसल्याची घोषणा होवुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीने अर्जात नमुद केलेली दावा दुरुस्ती ही मुळ दाव्यातील कथनांना जोडुन असल्याचे दिसुन येते. वादीने सुचवलेली दावा दुरुस्ती ही वादीच्या दाव्यातील मुळ कथनांना अनुसरुनच असल्याने सदर दावा दुरुस्ती ही मंजूर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार नाही तसेच सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचेही नुकसान होणार नाही. सदरची दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची आहे.

०८. दाव्याचे अवलोकन केले असता वादीने सदरचा दावा हा दिनांक ०६/०७/२०१८ रोजी दाखल केला आहे. निशाणी क्र. १ मध्ये वादी क्र. १ चे २०१८ साली वय १७ वर्षे व वादी क्र. २ चे वय १५ वर्षे दर्शविलेले असुन त्यांचा अ.पा.क. म्हणुन प्रतिवादी क्र. ३ सविता सोपान शेळके हिच्या नावाची नोंद असल्याचे दिसुन येते. सदयस्थितीला वादी क्र. १ व २ हे सज्ञान झाल्याचे नाकारता येत नाही. वादी क्र. १ व २ हे सज्ञान झाल्याने ते स्वतःच्या क्षमतेने प्रस्तुतचा दावा पुढे चालविण्यास सक्षम व तयार असल्याने तसेच उभय पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी सदरची दुरुस्ती ही न्यायोचित व आवश्यक असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदरची दावा दुरुस्ती मंजूर होण्यास वादी पात्र आहेत. म्हणुन मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी, मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.३ चे निष्कर्षाकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

<u>आदेश</u>

१) वादींचा अर्ज खर्च रक्कम रु.२००/- ने मंजूर करण्यात येत आहे. वादींनी सदर खर्चाची रक्कम प्रतिवादींना दयावी.

२) वादींनी १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्ती करुन दाव्याची दावा दुरुस्ती प्रत दाखल करावी.

Digitally signed by JANABAI SHESHRAO GAIKWAD
Date: 2022.09.20 10:41:45 +0530

( जे.एस.गायकवाड )

दि.१९/०९/२०२२

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
वाशी.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment / order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | A.A. Joshi, Stenographer, (Grade-III) |
| Court | --- | Civil Court,Washi,Tal.Washi, Dist.Osmanabad |
| Date | --- | 19-09-2022 |
| Order signed by the presiding officer on | --- | 19-09-2022 |
| Order uploaded on | --- | 20-09-2022 |